NCTE Code : APW00807/123141 University Code : 380

Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal,

# Swami Vivekanand College of Education, Udgir

(Approved by NCTE, Recognized by Govt. of Maharashtra and Permanent Affiliated to S. R. T. M. University Nanded)

ISO 9001 : 2015 Certified Institute

**Dr. Gopal Pawar** (M.Sc., M.A. (English), M.Ed., DIT., DSM., Ph.D.)
Principal

**Prof. [Dr.] Sudhir Jagtap** (M.Sc. M.Phil.Ph.D.)
Founder & President

Ref. No.SVCOE/ Date : **02/12/2022**

## Notice

All the students of B.Ed Third Semester are informed that the pre-sessional examination of the Third semester will be conducted in the college as per the attached schedule. All the students should take note of this. Good luck for the examination!

Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal
Swami Vivekanand College of Education, Udgir Dist.Latur

Principal
S V S P Mandal,
Swami Vivekanand College of Education, Udgir Dist.Latur

Survey No. 184, Jalkot Road, Bodhan Nagar, Tq. - Udgir Dist - Latur, Maharashtra – 413517.
Website : www.svceudgir.org, E-Mail : svcoedu380@gmail.com Phone & Fax No. (02385) 253970

SVSPM, SWAMI VIVEKANAD COLLEGE OF EDUCATION, UDGIR

Affileted to SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED.

B.Ed. Second Year –III Sem. - Regular

Pre-Semester Winter Examinations – 2022

The Examination shall be held on days & dates mentioned below

From 02.00 P.M. to 05.00 P.M. For III Semester

| Sr. No | Date | Time | Paper Code | Name of U.G. Course | Description / Paper Name |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 19.12.2022 | 02.00 P.M. to 05.00 P.M. | BEDCC301 | B.Ed. III Sem. | Childhood and Growing Up - III Sem. |
| 2 | 20.12.2022 | 02.00 P.M. to 05.00 P.M. | BEDCC302 | B.Ed. III Sem. | Assessment for Learning - III Sem. |
| 3 | 21.12.2022 | 02.00 P.M. to 05.00 P.M. | BEDCC303 | B.Ed. III Sem. | Action Research - III Sem. |
| 4 | 22.12.2022 | 02.00 P.M. to 05.00 P.M. | BEDEC304 | B.Ed. III Sem. | Guidance and Counseling - III Sem. OR |
| 5 | 22.12.2022 | 02.00 P.M. to 05.00 P.M. | BEDEC305 | B.Ed. III Sem. | Womens Education - III Sem. |

Date 04.12.2022

Incharge Exam.

Principal

Principal
S V S P Mandal,
Swami Vivekanand College of
Education, Udgir Dist.Latur

CS CamScanner

**SWAMI VIVEKANAND COLLEGE OF EDUCATION, UDGIR**

Faculty of Interdisciplinary Studies

Bachelor of Education (B. Ed.)

**B. Ed. S. Y. III Semester - CBCS Semester Pattern**

PRE-SEMESTER EXAMINATION – Winter - 2022

**BEDCC301 Childhood and Growing Up**

Time : 03 Hours    Date : 19.12.2022    Max. Marks : 75

N. B. 1. Q. No. 1 is Compulsory

2. From the Q. No. 2 to 4 solve any two Questions

3. From the Q. No. 5 to 7 solve any two Questions

प्र. क्र. १ अनिवार्य आहे

प्र. क्र. २ ते ४ पैकी कोणतेही दोन प्रश्न सोडवा

प्र. क्र. ५ ते ७ पैकी कोणतेही दोन प्रश्न सोडवा

Q. 1. Write Short Notes on (any three) टिपा लिहा (कोणत्याही तीनवर) (15)

i. Principles of Growth and Development - वाढ व विकासाची तत्वे

ii. Types of Personality - व्यक्तिमत्त्वाचे प्रकार

iii. Concept of Learning Styles - अध्ययनशैलीची संकल्पना

iv. Types of Mass Media - जनसंपर्काचे प्रकार

v. Concept of Multiculturalism - बहुसंस्कृतीवादाची संकल्पना

Q. 2. Explain the relationship between Development and learning. Describe the stages of Growth and Development. (15)

विकास आणि शिक्षण यांच्यातील संबंध स्पष्ट करा. वाढ व विकासाच्या टप्प्यांचे वर्णन करा.

Q. 3. Discuss the Sigman Frauied's theory of Personality. Explain the role of Teacher in the development Of Learners Personality. (15)

सिग्मंड फ्राईडच्या व्यक्तीमत्त्वाच्या सिद्धांतावर चर्चा करा. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासात शिक्षकाची भूमिका स्पष्ट करा.

Q. 4. How would you act as a Teacher in a Multicultural Classroom? (15)

एक शिक्षक म्हणून तुम्ही बहुसंस्कृतिक वर्गात कशाप्रकारे भूमिका कराल?

Q. 5. Describe the implications of political Domain on Childhood and Growing up. (15)

बाल्यावस्था आणि वाढत्या वयावर राजकीय क्षेत्राच्या परिणामांचे वर्णन करा.

Q. 6. Explain learning Diversity in classroom and the role of Teacher in it. (15)

अध्ययन कर्त्यांची वर्गांमधील विविधता आणि त्यात शिक्षकाची भूमिका स्पष्ट करा.

Q. 7. Explain the concept of Individual Differences implications of Individual Differences for learning to facilitate holistic Development. (15)

समग्र विकास सुलभ करण्याकरिता अध्ययनासाठी वैयक्तिक फरकांची संकल्पना स्पष्ट करा.

..........................................................................................

नाव - शिंदे मनाली भगवान
वर्ग - B Ed (SY)
रोल नं - 87
पेपर - 301 बाल्यावस्था व वाढते वय

प्र.1.

i) वाढ व विकासाची तत्वे :-

→ वाढ व विकास या परस्पराशी संबंधित संज्ञा आहे. वाढ ही आकारमान रचना असा परिणात्मक बदल दर्शविते. वाढ ही भौतिक संकल्पना आहे. उंची वाढणे, वजन, वाढणे आकारमान वाढणे हे आपणास मोजता येतात. विकास ही गुणात्मक संकल्पना आहे. विकास क्रमाक्रमाने प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत असतो ही सुधारणात्मक प्रक्रिया आहे.

वाढ व विकासाची तत्वे:-

1) विकासात सातत्य असते:-
अनुभव हा स्वश शुरू असतो प्रत्येक अनुभवातून व्यक्ती शिकत जाते या प्रत्येक अनुभवातून व्यक्ती परिपक्वतेकडे पाऊल टाकते. यातून स्व. विकसित करीत असते.

2) विकासात क्रमबद्दता असते
कोणत्याही बालकांचे निरीक्षण केल्यास असे लक्षात येईल की कोणते मुल एकदम पळायला लागत नाही.

अशा क्रिया करताना विशिष्ट क्रम असतो

3) विकास संकलित स्वरूपाचा असतो. बालकाने बोबडे बोल बोलण्यापूर्वी अनेक कृती केलेल्या असतात या कृतीचे संकलित रूप बोलण्यात व सांगण्यात दिसून येते.

4) विकास हा स्थूलाकडून सूक्ष्माकडे होतो. या हालचाली अत्यंत स्थूल स्वरूपात झालेल्या असतात ही सूक्ष्मता स्थूलतेनंतर प्राप्त झालेली असते.

5) विकासाचा वेग कमी जास्त असतो. पहिल्या 2-4 वर्षात मेंदूचा विकास जलद होतो व त्याचवेळी त्याचा मानसिक व शारिरिक विकास कमी होतो.

6) वाढ व ही भौतिक संकल्पना आहे वाढ ही संख्यात्मक असते वजन वाढणे, आकारमान वाढणे या गोष्टींचा समावेश होतो.

7) विकास अनुवंश व परिस्थितीवर अवलंबून असतो. बालकांचा शारिरिक, मानसिक, भावनिक विकासात ही फरक आढळून येतो याला अनुवंश हा घटक प्रभावी ठरतो.

04

CamScanner

2) व्यक्तिमत्वाचे प्रकार :-

→ व्यक्तिमत्वाचे चार प्रकार सांगितले आहेत

1) साधे व्यक्तिमत्व :-
- हा प्रकार उत्तिशाच आनंदी व उत्साही असतो
- सामाजिक, आशावादी व कधी कधी असंयमिन असतो
- चांगली संवाद कौशल्ये असतात व नवीन लोकांशी पटकन जुळवून घेतो

2) मध्यम व्यक्तिमत्व :-
- हा व्यक्तिमत्व प्रकार उद्दिष्ट उंचवणारा प्रभावशाली आणि नेतृत्वसारखा असतो.
- एकट्याने निर्णय घेणारा व स्पष्ट वाचन करणारा असतो.

3) दुःखी व्यक्तिमत्व :-
- हे प्रकार, चिंताशील, संवेदनशील व विचारशील असतात.
- एकाग्रतेसाठी लहान मुद्द्यांवर विचार करून निर्णय घेण्यासाठी ते लवकर सापडतात.

4) मूळ व्यक्तिमत्व :-
- हा व्यक्तिमत्व प्रकार, शांत, शांतचित्त व संयमित असतो.
- वेगवेगळ्या परिस्थितीमध्ये स्थिर व शांत राहतो.
- नवा बदल स्वीकारण त्याला थोडं कठीण होऊ शकत तो आपला काम सुरु करतो

3> अध्ययनशैलीची संकल्पना :-

→ अध्ययनशैली (Teaching methodology) म्हणजेच विद्यार्थ्यांना ज्ञान देण्यासाठी शिक्षकांनी वापरलेली पद्धत, प्रक्रिया किंवा धोरण यामध्ये विविध शैक्षणिक तंत्रांचा वापर केला जातो याद्वारे शिक्षक विद्यार्थ्यांना प्रभावीपणे शिकवू शकतात. अध्ययनशैलीची संकल्पना शिक्षणाच्या उद्दिष्टांवर आधारित असते म्हणजेच विद्यार्थ्यांना तात्विक, व्यवहारिक व सामाजिक दृष्ट्या सक्षम बनवण्याचे उद्दिष्ट साधणे.

अध्ययनशैलीची प्रमुख उदाहरणे :-

① परंपरागत अध्ययनशैली :-
यात शिक्षक विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ज्ञान देतात व सक्रिय भागीदारी कमी असते.

② सक्रिय अध्ययनशैली :-
यात विद्यार्थ्यांना अभ्यासाच्या प्रक्रियेत सामील केले जाते.


③ अन्वेषणात्मक अध्ययनशैली :-
यात विद्यार्थ्यांना आपल्या वेगळ्या अनुभवाद्वारे व स्वतःच्या विचारशक्तीला चालना देऊन शिकवले जाते.

03

प्र 3.

→ सिगमंड फ्राईडचा सिद्धांत :-

फ्राईडने मानवी व्यक्तिमत्वात ३ प्रकारची तत्वे असतात असे म्हटले आहे Id, Ego, Superego असे म्हटले आहे ही तिन्ही तत्वे एकमेकांशी संबंधित असतात हे स्पष्ट करण्यासाठी खालील आकृती दिली आहे.




फ्राईड हा सर्जनशील ; संवेदनक्षम ; मानशास्त्रज्ञ होता मूळ वैदिक व्यवसायतला होता मानसशास्त्राचा अभ्यास करून मनोविश्लेषण ही अभ्यासशाखा निर्माण केली. मानसशास्त्रातील अनेक गुंतागुंती सोडवण्याचा त्याने प्रयत्न केला. व्यक्तिमत्वाचे Id, Ego, Superego असे 3 घटक सांगितले या तिन्ही घटकांचा परस्परांशी संबंध येतो.

1) सुप्तात्मा (Id) :-

म्हणजे जन्मजात अशा शक्तीचा स्त्रोत होय जो मानवाच्या संपूर्ण आयुष्यभर मानवी अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी उर्जा पुरवितो.

2) बोधात्मा (Ego) :-

सुप्तात्मा हा जरी शक्ती स्त्रोत असला तरी मानवी अस्तित्व टिकवण्यासाठी आवश्यक असला तरी त्याला नियंत्रित करणे आवश्यक असते ते नियंत्रणाचे काम बोधात्मा करतो.

3) विवेकात्मा (super-ego)

या नावावरूनच एक गोष्ट स्पष्ट होते की हा विवेकशील असतो. सुप्तात्मा, बोधात्मा व विवेकात्मा या तिघांचे कार्य जरी वेगळ्या स्वरूपाच्या असल्या तरी एकमेकांशी निगडित आहेत.

व्यक्तिमत्व विकासात शिक्षकाची भूमिका :-

व्यक्तिमत्व विकास ही सतत विकसित होणारी प्रक्रिया आहे.

प्राथमिक शिक्षण - शिक्षकाची भूमिका

पूर्व प्राथमिक मधून काही गोष्टी शिकून बालक प्रवेश करतो. या काळात कृतीयुक्त शिक्षक, अक्षरज्ञान, शिक्षणासाठी आवश्यक सर्व प्राथमिक कौशल्य प्राथमिक शिक्षणातून आत्मसात करण्यासाठी शिक्षकाची भूमिका महत्त्वाची आहे. सामुहिक कार्य, वैयक्तिक मूल्य, आतिथ्य, संयम, सहकार्य हे मूल्य रुजवण्यात भूमिका महत्वाची आहे

2) माध्यमिक शिक्षण :-

यात विद्यार्थी कौमार्य-अवस्थेतून जात असल्यास शिक्षकाने वैज्ञानिक दृष्टिकोनातून होणाऱ्या बदलाची जाणीव करून त्याची उच्च आदर्शाचे पालनास प्रोत्साहन द्यावे खेळ, व्यायाम, चांगल्या सवयी, साहित्य, छंद जोपासणे व बाकी योग्य मार्गदर्शन आयुष्यभर कामी येते. विद्यार्थ्यांच्या समूहाला योग्य वळण लावणे, वाईट गोष्टी पासून परावृत्त करणे यासाठी शिक्षकाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे.

3) उच्च शिक्षण :-

यातून विद्यार्थी संशोधक बनतो. ज्ञानाचे दालनात ज्ञानाचा प्रस्फोट झाला आहे. समाजाला आवश्यक असणाऱ्या विविध क्षेत्रातील उच्च ज्ञान शिक्षकाची महत्वाची आहे व उच्च शिक्षण देणाऱ्या शिक्षकाची मार्गदर्शक भूमिका एक विकसित व्यक्तिमत्वास सहाय्यक ठरते.

शिक्षणाचे ध्येय साध्य करण्यात शिक्षकाची भूमिका महत्वाची आहे. शिक्षणाची अमूर्त ध्येय विद्यार्थी वर्तनात परावर्तित करण्यात शिक्षण महत्वाची भूमिका बजावते व त्यातूनच शिक्षण घेणाऱ्या बालकाचे व्यक्तिमत्व विकासा पावते.

Q1 = 10

प्र १.

→ बहुसांस्कृतिक वर्गात शिक्षकांची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची आहे. बहुसांस्कृतिक वर्ग म्हणजे विविध सांस्कृतिक, भाषिक, धार्मिक व सामाजिक पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थ्यांचा समूह. शिक्षकांना अशा वर्गात प्रभावीपणे शिक्षण देण्यासाठी विविध कौशल्यांची आवश्यकता असते.

शिक्षकांची भूमिका खालीलप्रमाणे :-

1) सर्व विद्यार्थ्यांचा आदर करणे :-
शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्याच्या सांस्कृतिक, धार्मिक व वैयक्तिक पार्श्वभूमीचा आदर केला पाहिजे त्यामुळे तर विद्यार्थ्यांना सुरक्षित व सन्मानित वाटले पाहिजे तसेच ते शिकण्यासाठी प्रेरित होतात.

२) समावेशक शिक्षण देणे :-
बहुसांस्कृतिक वर्गात शिक्षकांनी समावेशक शिक्षण पद्धती वापराव्यात ज्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याच्या गरजा पूर्ण होतात.
उदा - काही विद्यार्थी विशिष्ट भाषेत शिकण्यास कमी अनुभव असू शकतात तर इतरांना

कदाचित वेगवेगळ्या सांस्कृतिक संदर्भांची आवश्यकता असू शकते.

३) भाषिक विविधतेचा विचार करणे:-
बहुसांस्कृतिक वर्गात अनेक भाषिक पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थ्यांचा समावेश असतो. शिक्षकांनी विविध भाषिक आवश्यकता व आव्हानांची दखल घेत सर्व विद्यार्थ्यांना समजून घेणारी शिक्षण पद्धत अवलंबावी.

४) समान संधी प्रदान करणे:-
शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्याला समान संधी दिली विद्यार्थ्यांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक भिन्नतेसाठी विविध शैक्षणिक व वैयक्तिक सहाय्याचा विचार केला पाहिजे.

५) सकारात्मक संवाद प्रोत्साहित करणे:-
शिक्षकांनी विद्यार्थ्यांना एकमेकांशी संवाद साधण्यासाठी प्रेरित करणे हे महत्त्वाचे आहे हे संवाद सांस्कृतिक भिन्नता व विविधतेचे स्वागत करणारे असावे. ज्यामुळे विद्यार्थ्यांना एकमेकांना समजून घेता येईल

6) प्रेरणा व मोटिव्हेशन :-
बहुसांस्कृतिक वातावरणात शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यासाठी त्यांच्या पार्श्वभूमीच्या योग्यतेनुसार ह्या शिक्षणाच्या सर्व बाबीमध्ये सात्पूर्यपूर्ण प्रेरक आणि आदर्श असावे.

7) संवेदनशीलता आणि समज :-
शिक्षकांनी आपल्या विद्यार्थ्यांच्या पार्श्वभूमीबद्दल संवेदनशील असावे. बहुसांस्कृतिक वातावरणात शिक्षकांनी त्यांच्या विद्यार्थ्यांच्या ऐतिहासिक आणि सामाजिक संदर्भानुसार संवेदनशीलतेने उत्तर दिले पाहिजे.

या सर्व बाबी शिक्षकाच्या भूमिकेत समाविष्ट होतात. ज्यामुळे एक सकारात्मक समावेशक आणि समर्पक शिक्षण वातावरण तयार होऊ शकते.

10

P5 - 11

→ बाल्यावस्था आणि वाढत्या वयावर राजकीय क्षेत्राच्या परिणामांचे वर्णन

→ बाल्यावस्था आणि वाढत्या वयावर राजकीय क्षेत्राचे परिणाम महत्वपूर्ण असू शकतात. राजकीय वातावरण व समाजातील स्थिती व्यक्तीच्या विकासावर विविध प्रकारे प्रभाव टाकू शकतात. हे परिणाम शालेय जीवन, मानसिक विकास, सामाजिक वर्तन व समग्र व्यक्तिमत्वावर लक्ष देऊन समजून घेतले जाऊ शकतात.

• बाल्यावस्थेतील राजकीय परिस्थितीचा परिणाम :-

① भावनिक व मानसिक विकास :-

राजकीय अस्थिरता किंवा संघर्षामुळे बालकांच्या मानसिकतेवर आणि भावनिक स्थितीवर गंभीर परिणाम होऊ शकतात. अशा वातावरणात वाढणाऱ्या मुलांच्या जीवनात तणाव, भीती आणि असुरक्षितता निर्माण होऊ शकते.

② शालेय जीवनावर परिणाम :-

राजकीय दडपणामुळे

शालेय जीवनातील वातावरण हे खराब होऊ शकते जसे की शाळांमध्ये शिक्षणाची गुणवत्ता कमी होणे किंवा अभ्यासाच्या वातावरणाचा नाश होणे.

३) समाज आणि कुटुंबाच्या भूमिकेतील बदल :-

राजकीय बदल किंवा संघर्ष कुटुंबाच्या सामाजिक व आर्थिक परिस्थितीवर प्रभाव टाकू शकतात त्यामुळे मुलांच्या जीवनातील स्थिरता ही नाहीशी होऊ शकते.

(२) वाढत्या वयावर राजकीय क्षेत्राचे परिणाम :-

१) राजकीय जागरूकता :-

किशोरावस्थेत व्यक्ती राजकारणात सक्रियपणे सहभागी होऊ शकतो. देशातील राजकीय परिस्थितीचा त्याच्या विचारांवर प्रभाव पडतो. त्यांच्यामध्ये राजकारणात उतरण्याची आवड निर्माण होणे व त्याच्या विचारांमध्ये आपल्या राज्याबद्दल, तालुक्याबद्दल, जिल्ह्याबद्दल जागरूकता निर्माण होते.

2) सामाजिक वागणूक :-

राजकीय वातावरणामुळे किशोरवयीन मुलांच्या समाजातील स्थान व त्यांची भूमिका व मित्र - परिवाराशी असलेल्या नात्यांमध्ये बदल होऊ शकतात. त्या मुलांमध्ये समाजाबद्दल पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो ती सामाजिक कार्यामध्ये भाग घेण्यास उत्सुक होतो. त्याला स्वतःच्या समाजाबद्दल आवड निर्माण होते.

3) करिअर आणि भविष्य :-

राजकीय परिस्थिती आपल्या भविष्यातील करिअर निवडीवरही प्रभाव टाकू शकते उदा - राजकीय स्थितीमुळे काही क्षेत्रात जास्त संधी असू शकतात किंवा काही क्षेत्रामध्ये नोकऱ्या कमी होऊ शकतात.

यासारखे अनेक परिणाम मुलांच्या वयाच्या प्रत्येक टप्प्यावर अनुभवले जाऊ शकतात. राजकीय क्षेत्रांच्या बदलामुळे या बदलांचे स्वरूप आणि त्यांचे गांभीर्य विविध प्रकारे व्यक्तीवर परिणाम करते.

१६ = १०

प्र ६.

→ शिक्षण क्षेत्रात विविध प्रकारच्या विद्यार्थ्यांच्या आवश्यकता व त्यांच्या शिकण्याच्या शैलींची ओळख असणे आवश्यक आहे.

विद्यार्थ्यांची विविधता :-

१) शारिरीक व मानसिक क्षमता -
प्रत्येक विद्यार्थ्यांच्या शारिरिक व मानसिक क्षमतांमध्ये फरक असतो काहींना शारिरीक तर काहींना मानसिक अडचणी असू शकतात.

२) भाषिक विविधता :-
शिकत असते विद्यार्थ्यांची भाषा, बोली व संवादाची पद्धत वेगळी असू शकते.

३) सांस्कृतिक व सामाजिक विविध
विद्यार्थ्यांची सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमि देखील वेगळी असू शकते काही विद्यार्थ्यांना घरामध्ये शिक्षणाच्या संधी कमी मिळू शकतात तर काही वेगळ्या संस्कृती मधून आ असतात.

शिक्षकांची भूमिका :-

1) व्यक्तिगत शिकण्याचे वातावरण निर्माण करणे -
शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्याला त्यांच्या क्षमतानुसार लक्ष देणे आवश्यक आहे शालेय शिक्षण प्रणालीत विविध शिकणे व शिकवण्याची पद्धत आदानप्रदान करणे आवश्यक आहे.

2) शिक्षणाच्या पद्धतीत लवचिकता -
शिक्षकांनी विविध शिकण्याची शैली आणि विद्यार्थ्यांच्या आवश्यकता लक्षात घेऊन विविध शिक्षण पद्धती अवलंबाव्या.
उदा - प्रकल्प
शालेय संवाद.

3) समावेशी शिक्षण :-
शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्याला समान संधी देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांची विविधता स्वीकारून त्यांच्या क्षमतांनुसार मदत केली पाहिजे.

4) प्रेरणा व समर्थन -
शिक्षकांनी विद्यार्थ्याला प्रेरित करणे व त्यांना योग्य मार्गदर्शन करणे महत्वाचे आहे.

CamScanner

प्रत्येक विद्यार्थ्याला त्यांच्या आवडीनुसार किंवा अडचणींवर मात करण्यासाठी आवश्यक तशा प्रकारे प्रोत्साहित केले पाहिजे

5) संवेदनशीलता व समज :-
शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मानसिक व भावनिक गरजा समजून त्यांच्या सध्याच्या परिस्थितीला पाठिंबा देणे आवश्यक आहे. कधी कधी विद्यार्थ्यांना शालेय कार्यामध्ये अडचणी येऊ शकतात त्यामुळे शिक्षकांनी त्यांना त्यानुसार भावनिक व शैक्षणिक मदत पुरवली पाहिजे

10

**SWAMI VIVEKANAND COLLEGE OF EDUCATION, UDGIR**

Faculty of Interdisciplinary Studies

Bachelor of Education (B. Ed.)

**B. Ed. S. Y. III Semester - CBCS Semester Pattern**

PRE-SEMESTER EXAMINATION – Winter 2022

**BEDCC302 Assessment for Learning**

Time : 03 Hours        Date : 20.12.2022        Max. Marks : 75

N. B. 1. Q. No. 1 is Compulsory
2. From the Q. No. 2 to 4 solve any two Questions
3. From the Q. No. 5 to 7 solve any two Questions
प्र. क्र. १ अनिवार्य आहे
प्र. क्र. २ ते ४ पैकी कोणतेही दोन प्रश्न सोडवा
प्र. क्र. ५ ते ७ पैकी कोणतेही दोन प्रश्न सोडवा

Q. 1. Write Short Notes on (any three) टिपा लिहा (कोणत्याही तीनवर) (15)

i. Concept of evaluation - मूल्यमापनाची संकल्पना
ii. Types of Learning Experiences - अध्ययन अनुभवांची प्रकार
iii. Usability of the Test - चाचणीची उपयुक्तता
iv. Open Book Examination - मुक्त पुस्तक परीक्षा
v. Standard Scores – प्रमाणित प्राप्तांक

Q. 2. Discuss the relationship between Measurement, Evaluation and Assessment. (15)
मापन, मूल्यमापन व मूल्यनिर्धारण यातील परस्पर संबंधांची चर्चा करा.

Q. 3. Describe the character of a good Test and the factors of affecting on validity of the Test. (15)
चांगल्या चाचणीचे निकष सांगून सप्रमाण तेवर परिणाम करणारे घटक विशद करा.

Q. 4. Calculate Mean, Median and Mode from the following frequency distribution. (15)
खालील वारंवारिता विभाजनावरून मध्यमान, मध्यांक आणि बहुलक काढा.

| C. I. | 50-54 | 45-49 | 40-44 | 35-39 | 30-34 | 25-29 | 20-24 |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Frequency | 2 | 3 | 5 | 10 | 6 | 4 | 2 |

Q. 5. Explain the types and importance of Feedback in Learning. (15)
अध्ययनातील प्रत्याभरण्याचे महत्त्व आणि प्रकार स्पष्ट करा.

Q. 6. What is meant by observation techniques? Explain in detail Check List and Rating Scale. (15)
निरीक्षण तंत्र म्हणजे काय? पडताळा सूची आणि पदनिश्चयन श्रेणी सविस्तर स्पष्ट करा.

Q. 7. Calculate Standard Deviation from the following Frequency Distribution. (15)
खालील वारंवारिता विभाजनावरून प्रमाण विचलन काढा.

| C. I. | 90-99 | 80-89 | 70-79 | 60-69 | 50-59 | 40-49 | 30-39 | 20-29 | 10-19 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Frequency | 2 | 3 | 10 | 14 | 20 | 12 | 8 | 6 | 5 |

.....................................................................................................................................

नाव - शिंदे मनाली भगवान
वर्ग - B.Ed (SY)
रोल नं - 87
पेपर - 302 (अध्ययनाचे मूल्यमापन)

| Q1 | Q2 | Q4 & Q7 | Total |
| --- | --- | --- | --- |
| 11 | 10 | 15 10 15 | 61/75 |

प्र.1 ------------ ?

→ मूल्यमापनाची संकल्पना :-

मूल्यमापन हा शब्दही आपण व्यवहारात वापरतो ही सतत चालणारी प्रक्रिया आहे. विविध वस्तु, घटना व व्यक्तीचे आपण सतत मूल्यमापन करत असतो.

उदा - योगिता फार सुंदर गाते.
गणिताचे शिक्षक काय शिकवत आहेत हे कळतच नाही.

अशाप्रकारची विधाने म्हणजे योगिता, गणिताचे शिक्षक यांचे केलेले मूल्यमापन होय.

मूल्यमापन करताना गुण-दोषाचा विचार केला जातो. गुणाचे व दोषाचे प्रमाण लक्षात घेतले जाते व त्यावरून व्यक्तीचा दर्जा ठरवला जातो. मूल्यमापन दोषपूर्ण करण्याची शक्यता असते. शिक्षणप्रक्रियेत विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे मूल्यमापन करताना ते निर्दोष होणे आवश्यक असते. विद्यार्थ्यांना परीक्षेत मिळालेल्या गुणावरून त्याचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न केला जातो.

मूल्यमापन म्हणजे विद्यार्थ्यास पडलेल्या गुणावरून त्याचे गुणात्मक वर्णन करणे होय.

03

Page No.
Date

२) अध्ययन अनुभवांचे प्रकार :-

प्रमुख प्रकार :-

① सकारात्मक अध्ययन अनुभव :-

- हे अनुभव विद्यार्थ्यांना उत्साहवर्धक प्रेरणादायक व त्यांचे ज्ञान वाढवणारे असतात
उदा - शिक्षकांचा शाळेतील व वर्गातील सहभाग

② नकारात्मक अध्ययन अनुभव

- हे अनुभव विद्यार्थ्यांना निराश व असमाधानजनक व आव्हानात्मक वाटतात
उदा - दडपणाची भावना

③ प्रायोगिक अनुभव :-

- विद्यार्थ्यांनी थेट अनुभव घेतलेले शिक्षण जे प्रयोग, कार्यशाळा व प्रकल्पाद्वारे मिळवले जाते
उदा - विज्ञान प्रयोग, प्रकल्प इ

④ आवडीनुसार अध्ययन :-

- जेव्हा विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडी व रुचीनुसार शिकण्याची संधी मिळते.
उदा - ऑनलाइन कोर्स इ.

04

Page No.
Date

3) चाचणीची उपयुक्तता :-

म्हणजेच एखादया चाचणीचा किंवा चाचणी प्रक्रियेचा त्या विशिष्ट परिस्थितीत मिळवलेल्या परिणामांच्या संदर्भात त्याची उपयोगिता किंवा फायदे :-

① निराशसंख्या कमी करणे :-
चाचणीचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे एखादया विशेष परिस्थितीमध्ये योग्य परिणाम प्राप्त करणे व चुकीचे निर्णय टाळणे

② वेळेची बचत :-
चाचणी कमी वेळात परिणाम देत असल्यास त्याची उपयुक्तता वाढते हे विशेषत: महत्वाचे आहे. जेव्हा वेळेवर निर्णय घेणे आवश्यक असते.

③ अचुकता :-
चाचणी किती अचुक आहे हे देखील उपयुक्ततेवर प्रभाव पाडतो.

④ किंमतीची प्रभाविता :-
चाचणीच्या खर्चाची तुलना त्याच्या लाभाशी केली जाते चाचणीच उत्पादन किमतीत कमी असल तरी जर त्याचे परिणाम महत्वपूर्ण असतील तर ती चाचणी उपयुक्त ठरते.

04

प्र2 = 16

प्र.2 ------------ ?

→ शालेय अभ्यासक्रमामध्ये दोन प्रकारच्या चाचण्या वापरल्या जातात. विशिष्ट इयत्तेच्या ठरलेल्या अभ्यासक्रमावर आधारित स्वतःच्या विषयाची स्वतंत्र, शाळेपुरती, वर्गापुरती ची चाचणी शिक्षक तयार करतात त्यांना शिक्षक निर्मिती चाचणी म्हणतात.

विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे सर्वांगीण चित्र मिळवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या साधनांपैकी चाचणी एक आहे.

सप्रमाणता :-

सप्रमाणता हा मूल्यमापन साधनांचा अत्यावश्यक गुण आहे हा गुण आपण व्यवहारात रोजच पडताळून पाहतो.

"एखादया चाचणीद्वारे ज्या घटकाचे मापन करावयाचे असेल त्याचेच मापन पूर्णांशाने होत असेल तर ती चाचणी सप्रमाण आहे असे म्हणता येईल".

"बुद्धीमापनासाठी तयार केलेली चाचणी बुद्धीमापन अचूक करत असेल तर ती चाचणी सप्रमाण होईल.

विशिष्ट प्रकारच्या मापनासाठी तयार केलेले मापन साधन सप्रमाण करण्यासाठी त्याची योग्य रचना केलेली असते.
एखादे साधन विशिष्ट कारणाकरिता सप्रमाण असेल पण दुसऱ्या एखादया कारणाकरिता ते सप्रमाण असणार नाही किंवा ते असेलच याची खात्री देता येणार नाही.

उदा - 1) मिटरपट्टीद्वारे मिलीमीटर चे मापन अचूक करता येते म्हणूनच या मापनापर्यंत ते सप्रमाण आहे. यापेक्षा सुक्ष्म मापनासाठी ही पट्टी सहप्रमाण ठरणार नाही.

2) गणितातील तर्कशक्तीचे मापन करणारी चाचणी समप्रमाण आहे असे आढळले तर ते अवकाशाचा वेध ठरविण्यासाठी सप्रमाण असेलच असे नाही.

चांगल्या चाचणीवर परिणाम करणारे <u>घटक</u> :-

1) संस्कृतीचा परिणाम
2) प्रश्नाची क्लिष्ट भाषा
3) प्रश्नांची काठिण्यपातळी
4) निकृष्ट दर्जाचे प्रश्न
5) उद्दिष्टावर आधारित नसलेले प्रश्न
6) परीक्षेचे माध्यम.
7) वेळेची मर्यादा.

८) अप्रस्तुत कारकांचा प्रभाव
९) प्रश्नपत्रिकेची लांबी
१०) तेजोवलयाचा प्रभाव
११) उत्तराच्यास्वरूपातील प्रश्न.

10

...kshan Prasarak Mandal...

$P_4 = 15$

Page No.
Date

प्र. ४ ------------- १

→

| वर्गांतर | वारंवारता |
|---|---|
| 50 - 54 | 2 |
| 45 - 49 | 3 |
| 40 - 44 | 5 |
| 35 - 39 | 10 |
| 30 - 34 | 6 |
| 25 - 29 | 4 |
| 20 - 24 | 2 |

मध्यमान :-

एकूण वारंवारता = 2+3+5+10+6+4+2
= 32

मध्यम वर्ग शोधणे = $\frac{32}{2}$ = 16

50 - 54 = $\frac{4}{2}$ = 2

49 - 45 = 3

40 - 44 =

35 - 39 हा मध्यम वर्ग आहे

सूत्र = $L + \left(\frac{\frac{N}{2} - f}{f}\right) \times h$

L = मध्यवर्गाची किमान मर्यादा
N = वारंवारता
f = पूर्वीच्या वर्गाची वारंवारता
F = वर्तमान वर्गाची वारंवारता
h = वर्गाची रुंदी

Swami Vivekanand

$= 35 + \left( \frac{\frac{32}{2} - 10}{16} \right) \times 5$

$= 35 + \left( \frac{16 - 10}{10} \right) \times 5$

$= 35 + \left( \frac{6}{10} \right) \times 5$

$= 35 + 3$

$= 38$

<u>मध्यगा</u> = $N = 32$

$mdn = L + \left( \frac{\frac{N}{2} - F}{f} \right) \times I$

$N = 32$ $\quad mdN = \frac{N+1}{2}$

$I =$

$\frac{N}{2} = \frac{32}{2} = 16$ $\quad = \frac{32+1}{2}$ (16)

$CF = 17$

मध्यगा = 18.

<u>बहुलक</u> -
सर्वात जास्त वारंवारता 10 आहे जी 35-39 वर्गातील आहे

∴ बहुलक = 35-39

Page No
Date

$Q_{7-15}$

प्र. 7 ------------?

| वर्गांतर | वारंवारता | x |
|---|---|---|
| 90-99 | 2 | 94.5 |
| 80-89 | 3 | 84.5 |
| 70-79 | 10 | 74.5 |
| 60-69 | 14 | 64.5 |
| 50-59 | 20 | 54.5 |
| 40-49 | 12 | 44.5 |
| 30-39 | 8 | 34.5 |
| 20-29 | 6 | 24.5 |
| 10-19 | 3 | 14.5 |

N = 78

$\text{Mean} = \frac{\Sigma (f \times x)}{\Sigma f}$

$f \times x$ = ~~189~~ $(2\times 94.5)+(3\times 84.5)+$
$10\times(74.5)+ 14(64.5)+ 20(54.5)$
$+ 12(44.5) + 8(34.5) +$
$6(24.5)+ 3(14.5)$

$f \times x$ = ~~189~~ + 253.5 + 745 + 903
+1090 + 534 + 276 + 147 +
43.5
= 5128

वारंवारतेची एकूण बेरीज :-
$\Sigma f = N = 78$

Mean = ~~5128/78~~ $\frac{4932}{78}$
= ~~65.8~~ 63.23

Page No.
Date

प्रमाण विचलन (Variance)

$$Variance = \frac{\Sigma f (x - mean)}{\Sigma f}$$

प्रत्येक श्रेणीसाठी $(x - mean)^2$

| वर्गांतर | X | ~~x-63.8~~ | वारंवारता |
|---|---|---|---|
| 90-99 | 94.5 | | 2 |
| 80-89 | 84.5 | | 3 |
| 70-79 | 74.5 | | 10 |
| 60-69 | 64.5 | | 14 |
| 50-59 | 54.5 | | 20 |
| 40-49 | 44.5 | | 12 |
| 30-39 | 34.5 | | 8 |
| 20-29 | 24.5 | | 6 |
| 10-19 | 14.5 | | 3 |

$= (94.5 - 63.23)^2$
$= (31.27)^2$
$= 977.81$

$= (84.5 - 63.23)^2$
$= (21.27)^2$
$= 452.38$

$= (74.5 - 63.23)^2$
$(11.27)^2$
$= 127.07.$

Page No.
Date :

$= (64.5 - 63.23)^2$
$((11.27)^2$
$= 127.67$

$= (64.5 - 63.23)^2$
$= (1.27)^2$
$= 1.61$

$= (54.5 - 63.23)^2$
$= (-8.73)^2$
$= 76.2$

$= (44.5 - 63.23)^2$
$= (-18.73)^2$
$= 350.5$

$= (34.5 - 63.23)^2$
$(-28.73)^2$
$= 825.67$

$= (24.5 - 63.23)^2$
$(-38.73)^2$
$= 1502.67$

$= (14.5 - 63.23)^2$
$(-48.73)^2$
$= 2377.93$

$$\sigma = \sqrt{\frac{36990.57}{78}}$$

1.5

$= \sqrt{467.52}$

$= 21.6.$

Page No.
Date :

प्र. ८. ------------ ?

→ अध्ययनातील प्रत्याभरणाचे महत्व व प्रकार :-

अध्ययनातील प्रत्याभरणाचे महत्व चे प्रकार :-

1) सिद्धांत व तपासणीचा मार्ग :-
प्रत्याभरण हा संशोधनाचा मुख्य आधार असतो संशोधक एक निश्चित विचार किंवा सिद्धांत पुढे ठेवतो आणि त्याच्या सत्यतेची तपासणी करण्यासाठी प्रयोग किंवा निरीक्षणे करतो हे प्रतिपादन संशोधनाच्या दिशेची ठरवते.

२) संशोधनाची दिशा-
प्रत्याभरण संशोधनाला एक ठराविक दिशा येते. यामुळे संशोधकाला त्याच्या संशोधनावर लक्ष केंद्रित करण्यास मदत होते व अनावश्यक माहितीपासून बचाव होतो.

3) तथ्यांच्या संकलनासाठी आधार :-
प्रत्याभरणाच्या आधारावर संशोधक तथ्यांचा संकलन करतो तथ्यानुसार त्या प्रत्याभरणाचा तपास केला जातो.

Shikshan Prasarak Mandal Swami Vivekanand College of Education, Udgir Latur



4) नवीन ज्ञानाचा शोध :-

ज्याप्रकारे प्रत्याभरण विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर शोधण्यास मदत करते तसेच त्याद्वारे नवीन ज्ञानाची निर्मिती होते.

5) संशोधनाचे महत्व ठरवणे :-

प्रत्याभरणामुळे त्यांच्या उद्दिष्टे स्पष्ट होतात व त्याचे काय परिणाम असू शकतात हे ठरवणे शक्य होते.

6) समाधान व निर्णय घेणे :-

प्रत्याभरणाचे चाचणी केल्याने संशोधकाला निर्णय होण्यास मदत होते म्हणजेच त्यांनी तयार केलेल्या सिद्धांताची वैधता किंवा अप्रमाणता ठरवता येते.

महत्व :-

तर्कशक्तीचा वापर करून अध्ययनातील प्रत्याभरणाचे महत्व सांगितले आहे.

प्रत्याभरण करताना ते एका विशिष्ट तर्कशक्ती किंवा विचारधारेतून काढले जाते त्यामुळे संशोधनाची प्रक्रिया अधिक सुबोध होईल.

Page No.
Date :

## संशोधनाचे प्रमाण ठरवणे :-

प्रत्याभरणाची चाचणी करताना संशोधक संशोधनाचे सत्यतेचे प्रमाण ठरवू शकतो जर प्रत्याभरण नाकारले गेले तर त्यावर आधारित दृष्टिकोन निराधार ठरवले जाते

या कारणामुळे प्रत्याभरणाचे महत्त्व संशोधन प्रक्रियेत अत्यंत आवश्यक आहे.

—— o ——

10

CamScanner

**SWAMI VIVEKANAD COLLEGE OF EDUCATION, UDGIR**

Faculty of Interdisciplinary Studies

Bachelor of Education (B. Ed.)

**B. Ed. S. Y. III Semester - CBCS Semester Pattern**

PRE-SEMESTER EXAMINATION – Winter 2022

**BEDCC303 Action Research**

Time : 03 Hours Date : 21.12.2022 Max. Marks : 75

N. B. 1. Q. No. 1 is Compulsory

2. From the Q. No. 2 to 4 solve any two Questions

3. From the Q. No. 5 to 7 solve any two Questions

प्र. क्र. १ अनिवार्य आहे

प्र. क्र. २ ते ४ पैकी कोणतेही दोन प्रश्न सोडवा

प्र. क्र. ५ ते ७ पैकी कोणतेही दोन प्रश्न सोडवा

Q. 1. Write Short Notes on (any three) टिपा लिहा (कोणत्याही तीनवर) (15)

i. Limitations of Action Research - कृती संशोधनाच्या मर्यादा

ii. Steps in Action Research - कृती संशोधनातील पायऱ्या

iii. Participant and non - participant Observation- सहभागी आणि असहभागी निरीक्षण

iv. Features of a good Action Research - चांगल्या कृती संशोधनाची वैशिष्ट्ये

v. Case Study method – व्यक्ती अभ्यास पद्धती

Q. 2. Choose any Action Research problem and design the action research proposal. (15)

कोणतीही एक समस्या घेऊन कृती संशोधन आराखडा तयार करा.

Q. 3. Describe the meaning nature scope and principles of Action Research. (15)

कृती संशोधनाचा अर्थ, स्वरूप, व्याप्ती आणि तत्वे विशद करा.

Q. 4. Explain the process and limitations of Survey Method of Action Research with Examples. (15)

कृती संशोधनाच्या सर्वेक्षण पद्धतीची प्रक्रिया आणि मर्यादा उदाहरणासह स्पष्ट करा.

Q. 5. How will develop the professional development of a Teacher from Action Research? (15)

कृती संशोधनातून शिक्षकांचा व्यवसायिक विकास कशा प्रकारे केला जाऊ शकतो?

Q. 6. Which are the Quantitative tools of Data Analysis? Explain how you are going to use Percentage and Graphical representation in Action Research with suitable examples? (15)

माहिती विश्लेषणाची संख्यात्मक साधने कोणती आहेत? कृती संशोधनात शेकडेवारी व आलेखात्मक चित्रणाचा तुम्ही कसा उपयोग कराल ते उदाहरणासह स्पष्ट करा.

Q. 7. Make a Model of open and closed Questionnaire for Data Collection to one problem of Action Research.

कृती संशोधनाच्या एका समस्येसाठी माहिती संकलनाकरिता मुक्त व बंदिस्त प्रश्नावली चा नमुना तयार करा.

.............................................................................................................................

नाव - शिंदे मनाली भगवान
वर्ग - B.Ed (SY)
रोल नं - 87
पेपर - 303CC कृती संशोधन

| Q1 | Q3 | Q4 | Q5 | Q7 | Total |
|---|---|---|---|---|---|
| 12 | 11 | 12 | 10 | 10 | 55/75 |

प्र.1.

i)

→ कृतीसंशोधनाच्या मर्यादा :-

1) कायदेशीर मर्यादा :-

• कॉपीराईट कायदे :-
मूळ कृतीकाराच्या परवानगी-शिवाय कृती संपादित करणे किंवा वापरणे बेकायदेशीर ठरू शकते.

• सौंदर्यचौकट :-
मूळ लेखकाच्या कृतिचे स्वरूप व प्रतिमा कायम ठेवण्याचा अधिकार.

2) नैतिक मर्यादा :-

• संदेशाचे स्वरूप :-
संपादन केलेल्या कृतीचा मूळ संदेश विकृती होणार नाही याची काळजी घ्यावी.

• संवेदनशीलता :-
कोणत्याही समुदायाच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत याची दक्षता घेणे.

3) तांत्रिक मर्यादा :-

• तांत्रिक ज्ञान :-
संपादन करणाऱ्याला लागणारी योग्य कौशल्य किंवा साधने असणे.

4. माध्यम मर्यादा :-
कधी कधी मूळ कृति त्या स्वरूपावर केली गेली आहे.

11)
→ कृतिसंशोधनाच्या पायऱ्या :-

पुढीलप्रमाणे :-

1) समस्या ओळखणे :-
- अभ्यासाच्या क्षेत्रातील एखादी समस्या ओळखून ती स्पष्टपणे समजून घेणे.
- संबंधित घटकांचा अभ्यास करून त्या समस्येची कारणे शोधणे.
- समस्या ही विशिष्ट, मोजता येणारी व व्यवहार्य असावी.

2) योजनेची आखणी :-
- समस्येच्या निराकरणासाठी योग्य कृती आराखडा तयार करणे.
- उद्दिष्टे निश्चित करणे व साधने निवडणे
- सहभागी व्यक्तींना सहभागी करून घेणे.

3) कृती करणे :-
- आखलेल्या योजनेनुसार कृती करणे.
- योजना अमलात आणताना सर्व घटकांची नोंद ठेवणे.

4) निरीक्षण :-
- कृतीचा प्रभाव मोजण्यासाठी डेटा गोळा करणे.
- निरीक्षणाच्या समस्येवर उपाययोजनांचे परिणाम अभ्यासणे.

5) प्रतिबिंब व मूल्यांकन :-
- गोळा केलेल्या माहितीचे विश्लेषण करून निष्कर्ष काढणे.

4

Shikshan Prasarak ... Swami Vivekanand College of Education ... Latur



## → सहभागी आणि असहभागी निरीक्षण :

सहभागी निरीक्षण :-

- यामध्ये निरीक्षक संशोधनाच्या प्रक्रियेत भाग होतो म्हणजेच तो अभ्यास करत असलेल्या गटाचा सक्रिय सदस्य होतो.
- निरीक्षक गटातील सदस्यांप्रमाणे वागतो व त्यांच्याबरोबर त्यांचा अनुभव व क्रियावली घेतो.
- यामुळे निरीक्षकाला गटाच्या अंतर्गत गाभ्यातून माहिती मिळवता येते जी बाह्य निरीक्षणामुळे प्राप्त होत नाही.

उदा - किल्ल्याच्या किंवा दुर्गम गटावर जीवनावर अभ्यास करत असताना गटाचा भाग बनून अनुभव घेणे.

असहभागी निरीक्षण :-

- यामध्ये निरीक्षक गटाच्या क्रियावलीत किंवा जीवनात भाग घेत नाही.
- यामध्ये निरीक्षकाची भूमिका म्हणजे तो एक प्रेक्षक म्हणून कार्य करतो आणि तो गटाच्या अंतर्गत कार्यामध्ये हस्तक्षेप करीत नाही.
- असहभागी निरीक्षणामुळे निरीक्षकाला अधिक तटस्थ व निष्पक्ष दृष्टिकोन मिळतो.

उदा - शाळेतील शिक्षकांच्या वर्तनाचे निरीक्षण करणारा शास्त्रज्ञ.

4

प्र 3.

→ **कृतिसंशोधनाचा अर्थ :-**

शिक्षकांनी आपल्या समस्या स्वत: सोडवण्याचा शालेय प्रयत्न म्हणजे कृतिसंशोधन होय.

कृतीसंशोधनाला इंग्रजी भाषेत Action Research असे म्हणतात.

इ.स. 1930 मध्ये अमेरिकेतील मिनीसोटा विद्यापीठात कृतीसंशोधनाची सुरूवात झाली.

1949 ला मात्र कोरे लेविनने सर्वप्रथम कृतीसंशोधन ही संज्ञा वापरली. कृतीसंशोधनाचे प्रवर्तक डॉ. कोरे यांना म्हटले जाते.

"शिक्षकाने शिक्षणक्षेत्राशी संबंधित बाबींवर केलेले संशोधन म्हणजे कृतीसंशोधन होय."

**कृतीसंशोधनाची व्याप्ती :-**

तर्ककठोर संशोधन जीवनाच्या सर्वच क्षेत्रात शक्य आहे असे मात्र म्हणता येणार नाही. धर्म, मानवी व प्राण्यांचे भावजीवन, सत्यअसत्य यांसारख्या सापेक्ष कल्पना, आत्मा, ईश्वर यासारख्या अमूर्त कल्पना यांच्या बाबतीत संशोधन ही अतिशय अवघड किंबहुना अशक्य बाब आहे. या कारणाने या संबंधीची वस्तुनिष्ठ

माहिती संकलित करण्यामध्ये व माहितीची शास्त्रशुद्ध चिकित्सा करण्यात खूपच अडचणी आहेत. म्हणून ज्या क्षेत्रात व विषयात वर सांगितलेल्या शास्त्रीय विचार-पद्धतींचा वापर करता येतो त्याच क्षेत्रात संशोधन शक्य आहे इतर क्षेत्रातील नव्या माहितीची निर्मिती केवळ चिंतनातून होते. मात्र त्या नव्या ज्ञानाचा पडताळा सर्वांना मिळेलच असे मात्र नाही.

कृतीसंशोधनाची तत्वे :-

1) कृतीसंशोधनाची उद्दिष्टे मर्यादित असतात शिक्षण विषयक ज्ञानात नवी भर घालणे अपेक्षा शिक्षण-प्रक्रियेच्या अंमलबजावणीतील अडचणी दूर करणे हाच मुख्य उद्देश येथे असतो.

2) कृतीसंशोधनाचा विषय शिक्षकाच्या अथवा शैक्षणिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तीच्या प्रत्यक्ष कार्याशी संबंधित असतो.

3) कृतीसंशोधनाची अखेर समस्येवर तोडगा किंवा उपाय शोधण्यात झाली पाहिजे. शाळेतील विद्यार्थ्यांचे जीवशास्त्रातील सरासरी गुण खूपच कमी असतात असे लक्षात आले.

4) कृतिसंशोधनाचा विषय किंवा त्याची समस्या ही सार्वत्रिक समस्या नसते. वैयक्तिक किंवा एका शाळेतील शिक्षकांच्या वर्गाची असू शकते.

5) कृतिसंशोधनाची समस्या तात्कालिक स्वरूपाची असते.

6) कृतिसंशोधनाचे स्वरूप अतिशय लवचीक व परिवर्तनीय असते.

7) सत्याचे दर्शन :-
कृतीसंशोधनाची निर्मिती ही उद्भवलेल्या समस्यावर उपाय काढण्यात करण्यात आलेली असते. त्यामुळे त्यासंबंधित माहिती, व्यक्ती, कागदपत्र हे सत्य वास्तवता दर्शवणारी असतात.

8) सहयोगी संसाधन :-
कृती संशोधन प्रकल्पातील सहभागी सहसंशोधक असतात. सहयोगी संशोधनाचे सिद्धांत असे मानते की, प्रत्येक व्यक्तीच्या कल्पनांचे विश्लेषणात्मक व्याख्या तयार करणाऱ्या संभाव्य स्रोत स्वकीय महत्वपूर्ण आहे.

प्र. ११

प्र. १. - - - - - - - ?

→ वर्णनात्मक संशोधनात वर्तमान स्थिती संबंधीच्या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी आधार सामग्रीचे संकलन करावे लागते वर्णनात्मक संशोधन अभ्यासकास समग्र जनसमुदायाच्या विशिष्ठ लक्षणांचा अभ्यास करावयाचा असतो यासाठी अभ्यासक समग्र जनसमुदायाच्या विशिष्ट लक्षणाबाबत विश्वसनीय निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न करीत असतो.

सर्वेक्षण पद्धतीने संशोधनाचे स्वरूप लक्षात घेताना एक महत्वाचा मुद्दा लक्षात ठेवणे आवश्यक आहे तो म्हणजे एखादया विषयावर फार मोठ्या प्रमाणावर माहिती गोळा करणे म्हणजेच संशोधन नव्हे सर्वेक्षणाच्या माध्यमातून केलेल्या संशोधनाची उत्तरे शोधली जातात.

<u>सर्वेक्षण संशोधनाच्या प्रक्रिया</u> :-

१) समस्या निश्चित करणे.

(२) समस्येची उद्दिष्टे ठरविणे.

३) समस्याची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी योजना निश्चित करणे.

CamScanner

4. योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी साधनांची निवड व निर्मिती करणे.

5. साधनांद्वारे माहितीचे संकलन करणे.

6. संकलित माहितीचे अर्थनिर्वचन करणे.

7. अहवाल लेखन करणे.

कृतीसंशोधनाच्या सर्वेक्षण पद्धतीच्या मर्यादा :-

① सर्वेक्षणाच्या प्रतिनिधित्व समस्या -

अनेकवेळा सर्वेक्षणामध्ये वापरलेली नमुना पद्धती चुकीची किंवा अपूर्ण असू शकते ज्यामुळे निष्कर्ष सर्व लोकांच्या दृष्टिकोनातून प्रतिनिधित्व करत नाहीत यामुळे परिणाम अचूक नसू शकतात.

② उत्तरांची प्रमाणिकता :-

काहीवेळा प्रतिसादकर्ते प्रामाणिकपणे उत्तर देत नाहीत ते सामाजिक दृष्टिकोनातून किंवा इतर कारणामुळे चुकीचे किंवा संकोचपणे उत्तर देऊ शकतात.

CamScanner

3) स्वतःच्या अहंकाराने प्रभावित असणे

सर्वेक्षणात प्रश्न किंवा ते कसे विचारले जातात हे प्रतिसाद-कांच्या विचारांवर प्रभाव टाकू शकते. ज्यामुळे निष्कर्षावर प्रभाव पडतो.

4) मर्यादित प्रश्नांचे स्वरूप :-

काहीवेळा सर्वेक्षणातील प्रश्न संकुचित किंवा स्पष्ट नसतात जे प्रतिसादांच्या विविधतेला प्रतिबंधित करतात.

5) संपूर्णपणे दिलेली माहिती नसणे :-

प्रतिसादक काही महत्वाची माहिती गहाळ करू शकतात किंवा उत्तर देताना त्यांना आवश्यक असलेल्या संदर्भाचा अभाव असू शकतो.

6) पुनरावलोकनाची आव्हाने :-

सर्वेक्षणाच्या उत्तरांचा पुनरावलोकन करताना त्याची वृत्ती योग्यतेचे परीक्षण करणे आणि परिणामांच्या अचूकतेची तपासणी करणे कधी कधी कठीण असते.

7) वर्णनात्मक स्वरूप :-

सर्वेक्षण केवळ वर्णनात्मक माहिती देतो जेव्हा विश्लेषणात्मक किंवा गहन विश्लेषण आवश्यक असतो.

प्र.5.

→ कृतिसंशोधनाचा व्यवसायिक विकास साधण्यासाठी खालील प्रमुख टप्पे आहेत.

① मार्केट संशोधन व गरजा ओळखणे :-

व्यवसायिक विकासाच्या सुरूवातीला, बाजारातील आवश्यकतांची व ग्राहकांच्या गरजांची तपासणी महत्त्वाची आहे. त्यासाठी बाजारातील ट्रेंड, स्पर्धकांचे विश्लेषण ग्राहकांच्या अभिप्रायांचे संकलन व इतर संबंधित घटकांचा अभ्यास केला जातो.

② नवीन उत्पादन किंवा सेवेसाठी तंत्रज्ञानाचे संशोधन :-

व्यवसायिक प्रगतीसाठी व्यवसायातील नवीनतम तंत्रज्ञान प्रक्रियांचा व तंत्रांचा अभ्यास आणि त्यानुसार आवश्यक सुधारणा करणे महत्त्वाचे आहे. यामध्ये नवीन उपकरणांचा वापर, सॉफ्टवेअरचे अद्यतन किंवा उत्पादनाची कार्यक्षमता वाढवण्याचे तंत्रांचा समावेश होऊ शकतो.

3) प्रक्रिया सुधारणा :-

कार्यक्षमतेची वाढ करण्यासाठी प्रक्रिया सुधारणा ही आवश्यक आहे यामध्ये कृतीचे पुनरावलोकन, तांत्रिक पद्धतींचा वापर, कमी खर्चात उच्च गुणवत्ता राखणे आणि उत्पादन वेळ कमी करणे यासाठी योजना तयार केली जाते.

4) प्रशिक्षण व कौशल्ये विकास :-

कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण व त्यांचे कौशल्य सुधारणे व त्यांना नवीन तंत्रज्ञान शिकवणे या गोष्टी व्यवसायाच्या विकासासाठी अत्यंत महत्वाच्या ठरतात. कर्मचाऱ्यामध्ये योग्य कौशल्यांचे संवर्धन करून उत्पादकता व कार्यक्षमता सुधारली जाऊ शकते.

5) संचार व सहयोग :-

विविध विभाग, टीम्स व कार्यसंघ यांच्यात प्रभावी संवाद साधने महत्वाचे आहे. बाजारातील ग्राहकांसाठी योग्य ते उत्पादन किंवा सेवा ऑफर करणे याकडे विशेष लक्ष दिले जाऊ शकते.

६) विपणन रणनीती :-

व्यवसायाच्या विस्तारासाठी प्रभावी विपणन रणनिती ही महत्त्वाची आहे बाजारातील ग्राहकांसाठी योग्य ते उत्पादन यावर लक्ष दिले जाते.

७) नवीन बाजारपेठांमध्ये विस्तार :-

व्यवसायाचा विकास व वाढ साधण्यासाठी नविन बाजारपेठांमध्ये विस्तार करणे आवश्यक असते. यामध्ये आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील प्रवेश, ऑनलाइन विक्री करणे इ. असू शकते.

कृत्रिम शोधनाचा व्यावसायिक विकास एक समर्पित व नियमित प्रक्रिया आहे.

10

B-10

प्र67 -----------?

→ कृतीसंशोधनाच्या एका समस्येसाठी माहिती संकलन करण्यासाठी मुक्त व बंदिस्त प्रश्नावलीचा नमुना तयार करणे हे संशोधनाच्या उद्दिष्टांवर अवलंबून असते.

येथे "शाळेतील विद्यार्थ्यांच्या शारिरीक व मानसिक विकासावर खेळांच्या महत्वाचा प्रभाव" या विषयावर आधारित एक नमुना दिलेला आहे.

① बंदिस्त प्रश्न :-

1) शाळेत आपल्याला कधी खेळाचा वेळ मिळतो?

a) दररोज
b) आठवड्यातून एकदा
c) महिन्यातून एकदा
d) कधीच नाही.

2) खेळाने आपल्या शारिरीक स्वास्थ्यावर कसा प्रभाव पडतो.

a) सकारात्मक
b) नकारात्मक
c) खूप
d) काहीच नाही.

Page No.
Date

① बंदिस्त प्रश्न (होय / नाही)

1) तुम्ही या कार्यक्रमात सहभागी होण्यापूर्वी संबंधित क्षेत्रात काम केले आहे का?

a) होय
b) नाही.

2) तुम्हाला काम करताना काही अडचणी आल्या का?

a) हो
b) नाही

3) प्रशिक्षणाचा उपयोग तुम्हाला तुमच्या कामात झाला का?

a) हो
b) नाही

4) तुम्ही या प्रशिक्षणाच्या उद्दिष्टांशी सहमत आहात का?

a) हो
b) नाही

CamScanner

मुक्त प्रश्न (नमुना)

① तुम्ही या कार्यक्रमात सहभागी होण्याचे काय कारण होते?

→ विस्तृत उत्तर

② या प्रशिक्षणाने तुमच्या कामाच्या कार्यप्रणालीत कोणते बदल केले आहेत उदाहरणासह सांगा?

→ विस्तृत उत्तर.

इ.

—o—

10

**SWAMI VIVEKANAND COLLEGE OF EDUCATION, UDGIR**

Faculty of Interdisciplinary Studies

Bachelor of Education (B. Ed.)

**B. Ed. S. Y. III Semester - CBCS Semester Pattern**

PRE-SEMESTER EXAMINATION – Winter 2022

**BEDEC304 Guidance and Counseling**

Time : 03 Hours    Date : 22.12.2022    Max. Marks : 75

---

N. B. 1. Q. No. 1 is Compulsory

2. From the Q. No. 2 to 4 solve any two Questions
3. From the Q. No. 5 to 7 solve any two Questions

प्र. क्र. १ अनिवार्य आहे

प्र. क्र. २ ते ४ पैकी कोणतेही दोन प्रश्न सोडवा

प्र. क्र. ५ ते ७ पैकी कोणतेही दोन प्रश्न सोडवा

---

Q. 1. Write Short Notes on (any three) टिपा लिहा (कोणत्याही तीनवर) (15)

i. Concept of Guidance - मार्गदर्शनाची संकल्पना

ii. Principles of Guidance - मार्गदर्शनाची तत्वे

iii. Kinds of Guidance - मार्गदर्शनाचे प्रकार

iv. Counseling Centres - समुपदेशन केंद्रे

v. Areas of Counseling - समुपदेशनाची क्षेत्रे

Q. 2. Describe the various Theories of Guidance. (15)

मार्गदर्शनाचे विविध सिद्धांत विशद करा.

Q. 3. Which are the types of Guidance? Explain any two types in detail. (15)

मार्गदर्शनाचे प्रकार कोणते ? कोणतेही दोन प्रकार सविस्तर स्पष्ट करा.

Q. 4. Explain the meaning objectives and Educational implications of Counseling. (15)

समुपदेशनाचा अर्थ, उद्दिष्टे आणि शिक्षणावरील प्रभाव स्पष्ट करा.

Q. 5. Explain the techniques of Counseling and Distinguish between Directive and Non-directive Counseling. (15)

समुपदेशनाची तंत्रे सांगून निर्देशित आणि अनिर्देशित समुपदेशन यांच्यातील संबंध स्पष्ट करा.

Q. 6. Which is the relation between Guidance and Counseling and how to use it in teaching? (15)

मार्गदर्शन व समुपदेशन यातील संबंध कोणता ? ते सांगून वर्गाध्यापनात त्याचा वापर कसा कराल?

Q. 7. Explain the process of Counseling for Family, Parent, Adolescences and special groups. (15)

कुटुंब, पालक, पोगंडावस्थेतील बालके आणि विशेष गट यांची समुपदेशन प्रक्रिया स्पष्ट करा.

..........................................................................................

Page No.
Date

Swami Vivekanand Shikshan Prasarak Mandal
Swami Vivekanand College of Education, Udgir Dist.Latur

नाव - शिंदे मनाली भगवान
वर्ग - B.Ed (SY)
रोल नं - 87
पेपर - 304 (मार्गदर्शन व समुपदेशन)

| Q1 | Q2 | Q3 | Q5 | Q4 | Total |
|---|---|---|---|---|---|
| 12 | 12 | 12 | 12 | 12 | 60 |

प्र.1.

i) मार्गदर्शनाची संकल्पना :-

→ मार्गदर्शनाची संकल्पना म्हणजे व्यक्तीला किंवा गटाला योग्य दिशा, सूचना व सहाय्य देण्याची प्रक्रिया. यामध्ये अनुभव ज्ञान व सल्ला दिला जातो, ज्यामुळे त्या व्यक्तीला किंवा गटाला आपल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी योग्य मार्ग समजतो. मार्गदर्शनामध्ये शिक्षक, मार्गदर्शक किंवा वरिष्ठ व्यक्ती आपल्या अनुभवावर आधारित सूचनांची व मदतीची देणगी करतात हे कधी व्यक्तीला विकासासाठी महत्वपूर्ण असते.

• मार्गदर्शन विविध स्वरूपात असू शकते.

① व्यक्तिगत मार्गदर्शन :-
एकाच व्यक्तीला जीवनाच्या विविध पैलूवर मार्गदर्शन करणे.

② शैक्षणिक मार्गदर्शन :-
यामध्ये विविध प्रकारच्या समस्यांवर मार्गदर्शन केले जाते.

③ करिअर मार्गदर्शन :-
विद्यार्थ्यांचे करिअर निवडताना मार्गदर्शन केले जाते.

Page No.
Date :

२) मार्गदर्शनाची तत्वे :-

→ मार्गदर्शनाची तत्वे ही पुढीलप्रमाणे आहेत.

① प्रत्येकास मार्गदर्शन प्राप्त करण्याचा हक्क आहे.

② शाळा, पालक व शिक्षक यांच्यावर मार्गदर्शन उपलब्ध करून देण्याची प्रमुख जबाबदारी आहे.

③ संबंधित व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचा संपूर्ण विकास साधणे हे एक मार्गदर्शनाचे उद्दिष्ट आहे.

④ व्यक्तिभिन्नतेमुळे व्यवसायिक मार्गदर्शन बदलत राहते.

⑤ व्यक्तीच्या वर्तनात योग्य तो बदल घडवून आणण्यासाठी मार्गदर्शनाचा उपयोग होतो.

⑥ तज्ञांनीच मार्गदर्शनाची जबाबदारी घ्यावयाची असते.

⑦ मार्गदर्शन सेवा सातत्यपूर्ण असावी.

⑧ मार्गदर्शनाचे वारंवार मूल्यांकन करणे आवश्यक आहे.

⑨ मार्गदर्शनात गरजेनुसार बदल करणे आवश्यक आहे.

04

shan Pr. ... Mandal
...mi ...anand ...ge of ...cation, ...dgir ...Latur

Page No.
Date

3) मार्गदर्शनाचे प्रकार :-

प्रमुख ३ प्रकार :-
① वैयक्तिक मार्गदर्शन
② सामूहिक मार्गदर्शन
③ विशेष उपचारात्मक मार्गदर्शन

① वैयक्तिक मार्गदर्शन :-
- या पद्धतीत एकावेळी एकाच विद्यार्थ्याला त्याचा सर्वांगीण अभ्यास करून मार्गदर्शन केले जाते.
- मार्गदर्शन करणारी व्यक्ती अनुभवी, तज्ञ, प्रशिक्षित व आवड असणारी असावी.
- विकृती दूर करण्यासाठी मार्गदर्शन केले जाते.

② सामूहिक मार्गदर्शन :-
- यावेळी अनेकांना मार्गदर्शन करता येते.
- शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक अशा विविध समस्यांकरिता मार्गदर्शन केले जाते.
- तंत्रे, व्याख्याने, नाटक, चर्चा याद्वारे मार्गदर्शन केले जाते.

③ विशेष उपचारात्मक मार्गदर्शन :-
- विद्यार्थ्यांच्या समस्यांचे योग्य निदान करून त्याबाबत उपचार करण्याची ही शास्त्रशुद्ध पद्धती होय.
- विकृत वर्तनामध्ये सुधारणा घडवून आणतात

04

CamScanner

प्र.2.

→ मार्गदर्शनाचे विविध सिध्दांत -

मार्गदर्शनात व्यक्ती व समाज या दोघांच्याही हिताचा विचार केलेला असतो मार्गदर्शन या प्रक्रियेत व्यक्तीला स्वत:च्या समस्या सोडवण्यासाठी सक्षम बनवणे नवीन परिस्थितीत समायोजन साधण्यास सहाय्य करणे तसेच व्यक्तीचा सामाजिक, सांस्कृतिक व्यवसायिक व आध्यात्मिक सर्वांगिण विकास साधणे या बाबींचा समावेश होतो.

मार्गदर्शन काही विशिष्ट सिध्दांतावर काम करत असते यातील काही प्रमुख सिध्दांतांना लेस्टर डी क्रो व एलिस क्रो यांनी An Introduction to guidance या पुस्तकात विषद केले आहे त्याचे विवरण हे आहे.

1) व्यक्तीच्या संपूर्ण व्यक्तिमत्वाच्या प्रदर्शनात व व्यवहारात जे महत्वपूर्ण घटक असतात त्यांना मार्गदर्शन सेवेत महत्व दिले गेले पाहिजे.

2) मार्गदर्शनात मानवाच्या व्यक्ती-

...kshan Prasarak ...
...ami ...anand
...ege of ...cation, ...dgir ...Latur

Page No.
Date

भिन्नतेच्या स्तरानुसार व आवश्यकतेनुसार महत्त्व दिले गेले पाहिजे.

3) व्यक्तीला प्रेरित करण्यासाठी मार्गदर्शनाची आवश्यकता असते.

4) वर्तमान समस्यांच्या समाधानासाठी प्रशिक्षित व अनुभवी मार्गदर्शकालाच मार्गदर्शनाचे दायित्व दिले गेले पाहिजे.

5) मार्गदर्शन ही बाल्यावस्थेपासून ते प्रौढावस्थेपर्यंत निरंतर चालणारी प्रक्रिया आहे.


6) सर्वांना लाभ घेता यावा मार्गदर्शन ही प्रक्रिया सर्वसुलभ बनवली गेली पाहिजे.

7) विविध पाठ्यक्रमासाठी तयार केलेल्या अध्ययन सामग्री व शिक्षणाच्या पद्धतीमध्ये मार्गदर्शनाचा दृष्टिकोन प्रतिबिंबित झाला पाहिजे.

8) शिक्षक व पालकांवर मार्गदर्शनाचे उत्तरदायित्व सोपवले पाहिजे.

9) मार्गदर्शनासाठी त्याच्या स्तरानुसार विशिष्ट समस्यांना न्याय देण्यासाठी प्रशिक्षित व्यक्तीकडेच दिले पाहिजे.

शुडमच्या मते मार्गदर्शनाचे पाच सिध्दांत




12

प्र3.

→ मार्गदर्शनाचे प्रकार :-

व्यक्तींना मदत करणाऱ्या अनेक सेवांचा मार्गदर्शन प्रक्रियेत समावेश होतो.

मार्गदर्शनाचे प्रमुख 3 प्रकार :-
① शैक्षणिक
② व्यवसायिक
③ वैयक्तिक

① शैक्षणिक मार्गदर्शन :-
(Educational Guidance):-

रूथ स्ट्रँगच्या मते-
" व्यक्तीला योग्य कार्यक्रम निवडण्यासाठी व त्यामध्ये प्रगती करण्यासाठी सहकार्य करणे म्हणजे शैक्षणिक मार्गदर्शन !"

शैक्षणिक मार्गदर्शनाची गरज :-

1) विद्यार्थ्यांच्या क्षमता व आवड गरजांनुसार योग्य अभ्यासक्रमाची निवड करण्यासाठी मार्गदर्शनाची गरज असते.

② योग्य अभ्यासक्रम निवडीसाठी मार्गदर्शन हवेच.

5) विविध अभ्यासक्रमाची माहिती होण्यासाठी मार्गदर्शनाची गरज असते.

4) मुलभूत गुणांचा शोध घेऊन त्यांचा विकास साधून व्यक्तिमत्व विकासासाठी मार्गदर्शन हवे.

② व्यवसायिक मार्गदर्शन :- (Vocational Guidance)

रॉबर्डसच्या मते :-

" व्यवसायिक मार्गदर्शन हे व्यवसाय निवड व व्यवसाय समायोजन यातील नमाशी निगडीत आहे.

गरज :-

① व्यवसायिक ताण कमी करण्यासाठी मार्गदर्शन हवे.

② प्रशिक्षण, प्रवेश शर्ती इ. माहितीसाठी मार्गदर्शन हवे.

③ योग्य व्यवसाय निवडीसाठी स्वतःची कुवत, क्षमता यांची माहिती मिळवण्यासाठी.

④ व्यवसाय प्राप्तीनंतर तो व्यवसाय व तेथील वातावरण व इतर सहकारी यांच्याशी योग्य समायोजन साधण्यासाठी.

12

...iksshan Prasar... Swami ...anand ...ege of ...ation, ...gir ...atur ...Jeppe

Page No
Date

२

Pc = 12

प्र 5 ------------ ?

→ समुपदेशनाची तंत्रे :-
समुपदेशनासाठी प्रमाणित आणि अप्रमाणित साधने व तंत्रे वापरली जातात ती पुढीलप्रमाणे :-

अ) प्रमाणित साधने व तंत्रे :-
1. बुद्धिमत्ता कसोट्या
2. अभिरूची शोधिका
3. अभियोग्यता चाचण्या
4. प्राविण्य कसोट्या
5. अभिवृत्ती कसोट्या
6. व्यक्तिमत्व मापन चाचण्या
7. नैदानिक कसोट्या
8. सर्जनशीलता कसोट्या
9. प्रक्षेपण चाचण्या व तंत्रे

ब) अप्रमाणित साधने व तंत्रे :-
1. प्रश्नावली
a) बद्ध प्रश्नावली b) मुक्त प्रश्नावली
2. समाजमिती तंत्र
a) ओळखा पाहू तंत्र b) संप्रेषण आलेख
c) समाज आलेख d) समाजमिती
3. जीवनवृत्तांत पद्धती
a) औपचारिक b) अनौपचारिक
4. मुलाखती
a) मुक्त
b) प्रमाणित
5. आत्मचरित्र
1) मुक्त
2) सुरचित
6. गृहभेटी

CamScanner

Page No.
Date

निर्देशित व अनिर्देशित समुपदेशन यांच्यातील संबंध :-

निर्देशित पद्धती :-

विद्यार्थ्यांना समुपदेशकांना त्यांचे मन स्पष्टपणे विचारले असल्यासही ही पद्धती अनुकुल ठरते.

तात्पुरत्या, विकासात्मक कौशल्यासंबंधी निर्माण होणाऱ्या समस्यांना ही पद्धत अधिक योग्य असते.

विद्यार्थ्याला त्याच्या समस्येचे विश्लेषण चिंतन करण्याची संधी दिली जात नाही.

अनिर्देशित पद्धती :-

विद्यार्थ्याला नेहमीच इतरांच्या सल्ल्याची किंवा सहाय्याची आवश्यकता भासत नाही.

स्वभाव संकलन करण्यात उत्तेजन देण्याकरीता ही पद्धती अनुकूल ठरते.

स्वतःच्या योग्यता, सामाजिक गरजा व उपलब्ध संधी यांचे ज्ञान क्वचितच असते.

CamScanner

Shikshan Prasarak Mandal * Swami Vivekanand College of Education, Udgir Dist Latur



## निर्देशित समुपदेशन :-

- यामध्ये ट्रेनिंग डेटामध्ये input व output दोन्ही असतात

- मशीनला दिलेल्या उदाहरणावरून ते output अंदाजाने शिकते.
  उदा - Email ला Spam किंवा non spam अशी लेबल देणे.

- हा प्रकार डेटा विश्लेषण करण्यासाठी व वर्गीकरण किंवा Regression समस्यासाठी वापरला जातो.

## अनिर्देशित समुपदेशन :-

- यामध्ये फक्त Input डेटा दिला जातो output लेबल्स नसतात.

- मशीनला फक्त डेटा दिला जातो ते डेटामध्ये चुकता गट किंवा विशिष्ट नमुने शोधते.

- हा प्रकार क्लस्टरिंग किंवा असोसिएशन सारख्या समस्यांसाठी वापरला जातो.

संबंध - निर्देशित समुपदेशन लेबल्स असलेल्या डेटावर शिकते तर अनिर्देशित समुपदेशन लेबल्स नसलेल्या डेटावर शिकते.

12

प्र.6 - - - - - - - - - - ?

→ मार्गदर्शन व समुपदेशन हे दोन महत्त्वाचे मानसिक स्वास्थ्य व शैक्षणिक क्षेत्रातील टर्म्स आहेत ज्यामध्ये एकमेकां-सोबत संबंध असून तरी यामध्ये काही भेद आहेत.

① मार्गदर्शन (Guidance):-

मार्गदर्शन म्हणजे तर विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक, वैयक्तिक आणि करिअरशी संबंधित निर्णय घेण्यासाठी योग्य दिशा देणे यामध्ये शिक्षक किंवा कन्सल्टंट विद्यार्थ्याला त्याच्या आवडीनिवडी क्षमता, वय व जीवन स्थितीच्या आधारावर योग्य मार्ग हे निवडण्यास मदत करतो.

② समुपदेशन (Counselling):-

समुपदेशन म्हणजे एक प्रकारची संवाद प्रक्रिया ज्याद्वारे समुपदेशक विद्यार्थ्यांचे मानसिक व भावनिक मुद्दे समजून त्यावर योग्य उपाय सुचवतो यामध्ये विद्यार्थी त्यांच्या चिंतांच्या, अशांततेच्या किंवा इतर मानसिक तणावाचा निवारण करण्यासाठी समुपदेशकाकडून मदत घेतो.

**संबंध :-**

मार्गदर्शन व समुपदेशन यांचा संबंध विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाशी संबंधित आहे. मार्गदर्शन विद्यार्थ्यांना शैक्षणिक व करिअर मार्गदर्शन देते तर समुपदेशन त्यांच्या मानसिक स्थिती, भावनात्मक गोंधळ किंवा इतर दडपणांचा समजून घेतो व त्यांस योग्य उपाययोजना सुचवतो. दोन्ही प्रक्रियांमध्ये समर्पण, सहानुभूती व विश्वास आवश्यक आहे.

**वर्गअध्यापनात वापर :-**

① **मार्गदर्शन :-**
मार्गदर्शन विद्यार्थ्यांना त्यांच्या अध्ययनाच्या मार्गावर योग्य दिशा देण्याचे कार्य करते हे विद्यार्थ्यांना मानसिक, सामाजिक व भावनिक सहाय्य प्रदान करण्यात मदत करतात.

• **शैक्षणिक दिशा :-**
विद्यार्थ्यांना योग्य अध्ययन पद्धती, वेळापत्रक तयार करणे, गृहकार्याच्या बाबतीत मार्गदर्शन करणे.

• वैयक्तिक व सामाजिक प्रश्न :-
विद्यार्थ्यांच्या

वैयक्तिक समस्यांचे निराकरण करण्यासाठी मार्गदर्शन.

२) समुपदेशन :-

- भावनिक समर्थन :- विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्यावर लक्ष देणे, त्यांना चिंता, तणाव किंवा इतर भावनिक समस्यांवर चर्चा करण्यासाठी सुरक्षित वातावरण देणे.

वापर =

- शैक्षणिक सामाजिक व मानसिक समस्यांचा समग्र दृष्टिकोन :- मार्गदर्शन व समुपदेशन विद्यार्थ्यांच्या शाळेतील एकूण अनुभवाला चांगले आकार देतात.

- वैयक्तिक व शैक्षणिक तणावाचे निराकरण :- शाळेतील तणाव किंवा शैक्षणिक दबावात असलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व समुपदेशन दोन्हीच्या सहाय्याने उत्तम मार्ग मिळवता येतो.

12
Seen